**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १४ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी, बाबासाहेबांचे तत्व आणि आदर्श हे आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देईल- पंतप्रधान नरेंद्र मोदी.
2. नागपूरसह विदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी, दीक्षाभूमीवर अनुयायांची अलोट गर्दी.
3. 2047 पर्यंत भारताच्या विकसित राष्ट्राच्या जडणघडणीत भारतीय राजस्व सेवा- आयआरएसची भूमिका महत्त्वाची - केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांचे नागपूरच्या एनएडीटी इथं प्रतिपादन.
4. नागपूर मनपाच्या अग्निश्मन दलात होणार नव्या तंत्रज्ञानाचा वापर- मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांचे अग्निशमन सेवा दिनी प्रतिपादन.

-----------------------------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. संसद भवन परिसरात प्रेरणा स्थळ इथं बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरीवंश, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह, केंद्रीय मंत्रिमंडळातल्या इतर सदस्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामाजिक संपर्क माध्यमावरच्या संदेशात, डॉ.आंबेडकरयांना अभिवादन केलं. त्यांच्या प्रेरणेमुळेच आज देश सामाजिक न्यायाचं स्वप्न साकार करण्यासाठी समर्पित वृत्तीनं कार्यरत आहे. त्यांची तत्व आणि आदर्श हे आत्मनिर्भर आणिविकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देईल, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.-**

*बाबासाहेब हमें क्या संदेश देते उन्होंने समाज को एक ही बात कही, भाई शिक्षित बनो और एक बार अगर आप शिक्षित होगे तो दुनिया के सामने आप आंख से आंख मिलाकर के बात कर पाओगे। दूसरा मंत्र दिया संगठित बनो, तीसरा बात बताया मानवता के पक्ष में संघर्ष, अमानवीय चीजों के खिलाफ़ आवाज उठाओ ये तीन मंत्र आज भी हमें प्रेरणा देते रहे हैं हमें शक्ति देते हैं।*

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांतीचे जनक होते. समानता प्रस्थापित करण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील दलित आणि इतर वंचित समुदायांसाठी बाबासाहेब हे आशा, प्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाचं प्रतीक आहेत, असे गौरवोद्गार राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी दादर चैत्यभूमी येथील अभिवादन सोहळ्यात काढले. बाबासाहेबांनी आधुनिक भारताचा पाया रचला, असं राज्यपाल म्हणाले. मुंबईत चैत्यभूमी इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी उसळली आहे. चैत्यभूमी स्मारकामध्ये राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळी अभिवादन केलं. यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी एकसंघ भारताचं श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी साकारलेल्या संविधानाला असल्याचं सांगितलं. संवैधानिक मूल्यांपासून दूर न होता, संविधानानुसारच संकल्प करण्याचं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

*आज एक संघ भारत आपण बघतो आहे है, याचं श्रेय जर कोणाला द्यायचं असेल, तर ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या संविधानाला आपल्याला द्यावं लागेल भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेलं कार्य हे अतुल्यनिय अश्या प्रकारचा है, समता या देशामध्ये स्थापित करण्याचं काम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केल आणि संविधानच्या माध्यमातनं प्रत्येक व्यक्तीला जगणाचा समान अधिकार दिला, प्रत्येक व्यक्तीला संधीची समानता दिली आणि प्रत्येकाची स्वप्न हे पुर्ण होऊ शकतील अश्या प्रकारचा संविधान हे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दिलं.*

तत्पूर्वी, चैत्यभूमी स्मारकावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांसोबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त चैत्यभूमी इथं वृक्षारोपण केलं. तसंच अखंड भीम ज्योतीला अभिवादन केलं. मुंबईतिल वडाळा पूर्व येथील कोरबे मिठागर भागात डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

-----------------------------------

डॉ.आंबेडकर जयंती- नागपूर

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्य नागपूर जिल्ह्यातील कामठी इथल्या ड्रॅगन पॅलेस इथं त्यांच्या प्रतिमेला माजी राज्यमंत्री आणि ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या संचालिका ॲड. सुलेखाताई कुंभारे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बुद्ध वंदना देखील घेण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त नागपूर जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूरच्या दीक्षाभूमीवर अनुयायांनी अलोट गर्दी केली असून अभिवादनासाठी सकाळपासून रांगा बघायला मिळाल्या. एका अनुयायाने आपल्या भावना व्यक्त केल्या.

*दीक्षाभूमीवर आल्यावर जी आंबेडकरांनी  अनुयायांमध्ये जी ऊर्जा निर्माण होते बाबासाहेबांनी केलेल्या कर्तृत्वाचा अभिमान मनामध्ये जागून मानवंदना देण्याकरता दरवर्षीप्रमाणे दीक्षाभूमी मध्ये उपस्थित राहतो आणि एक आनंदाचा सोहळा १३४ व्या जयंतीनिमित्त एक वेगळं आनंद या दीक्षाभूमीवर दिसून राहिलेलं आहे.*

तत्पूर्वी, काल निळ्या गुलालाची उधळण, ढोल-ताशांचा गजर आणि फटाक्यांच्या आतषबाजीत इंदोरा बुद्धविहारातून डॉ. आंबेडकर धम्मज्योत मिरवणुक निघाली. दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या मार्गदर्शनात निघालेल्या मिरवणुकीत हजारो धम्म बांधव सहभागी झाले. भदंत ससाई यांच्या हस्ते बाराच्या ठोक्याला केक कापण्यात आला. अनुयायांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्याने पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल विशेष बैठक घेवून संविधान चौकासह ठिकठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवला. दरम्यान, नागपूर आकाशवाणी, नागपूर महानगरपालिका, विभागीय आयुक्तालय, विभागीय माहिती कार्यालय, नागपूर महावितरण  यासह सरकारी आणि खाजगी संस्थांमध्ये जयंती साजरी करण्यात आली. आकाशवाणी आणि दूरदर्शन अनुसूचित जाती अनुसूचित जमाती कर्मचारी कल्याण मंडळातर्फे आज आकाशवाणी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ भोजनदान आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सामग्री वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं. याशिवाय नागपूर आकाशवाणी कार्यालयात बाबासाहेबांच्या प्रतिमेला

माल्यार्पण करण्यात आलं. यावेळी आकाशवाणी नागपूरचे उपमहा संचालक रमेश घरडे आणि दूरदर्शनच्या सहाय्यक संचालक रचना गजभिये उपस्थित होत्या.

-----------------------------------

## हर घर संविधान

महसूलमंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज "घर घर संविधान" या शासनाचा महत्वाकांक्षी उपक्रमाचा आरंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी नागपूर जिल्ह्यातून करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून भारतीय संविधानाची उद्देशिका नागपुरात घरोघरी वाटण्यात येणार असून महिनाभरात ही वाटप प्रक्रिया संपन्न करण्यात येईल अशी माहिती त्यांनी दिली.

-----------------------------------

## प्रत्यक्ष कर अकादमी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे ध्येय समोर ठेवले असून या विकसित राष्ट्राच्या जडणघडणीत भारतीय राजस्व सेवा - आयआरएसची भूमिका ही महत्त्वाची असणार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज केले. नागपुरातील प्रत्यक्ष कर अकादमी एनएडीटी येथे 77 व्या तुकडीतील भारतीय आयआरएसच्या दीक्षांत समारंभा प्रसंगी तसेच सेवापूर्व प्रशिक्षणाच्या समारोपाच्या प्रसंगी ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. याप्रसंगी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे सदस्य प्रबोध सेठ, प्रधान महासंचालक संजय बहादूर, प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी रॉयल भूतान सेवेच्या 2 अधिकाऱ्यांसह 84 आयआरएस अधिकारी प्रशिक्षणार्थींनी 16 महिन्यांचे सेवा पूर्व प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर कर प्रशासकाची शपथ घेतली. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी भारतीय राजस्व सेवेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, भारत ही वेगाने वाढणाऱ्या निवडक अर्थव्यवस्था पैकी एक अर्थव्यवस्था असून, देशाच्या वित्तीय प्रशासनाचा भारतीय राजस्व सेवा हा कणा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मागील 10 वर्षात अनेक लोकोपयोगी योजना ज्यामध्ये स्टार्टअप, मुद्रा, आवास योजना, आयुष्मान भारत योजना यांचा समावेश आहे यशस्वीरित्या राबवल्या जात असल्याचे सांगून गेल्या 8 एप्रिलला मुद्रा या योजनेला 10 वर्ष पूर्ण झाले असून, या योजनेचा फायदा लोकांना झाला असल्याचेही त्यांनी सांगितले.

*क्योंकि 8 अप्रैल को मुद्रा योजना का 10 वर्ष पूरा हुआ है, तो 10 वर्षों में हमारी सरकार ने 52 करोड  लोगों को 33 लाख करोड़ से ज्यादा कॉलेटरल फ्री लोन देने का काम किया था और यह लोन कोई बड़ा लोन नहीं था। 50 हजार से लेकर के २० लाख तक के अमाउंट के होते हैं। आज इन लोन की सहायता से लोगों ने अपने नए नए उद्धम स्टार्ट किए। मुझे ये बताते हुए भी अत्यंत प्रसन्नता हो रही है की इसमें जो लोन पाने वाले हैं उसमें अड़सठ फ़ीसदी हमारी महिलाओं ने लोन लेकर के और इस नया उद्धम का स्टार्ट किया.*

या 16 महिन्याच्या सेवापुर्व प्रशिक्षणामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या समीर राजा या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष कर, ॲडवान्स अकाऊंटींग तसेच इतर विषयातील चांगल्या गुणांसाठी सर्वाधिक सुवर्णपदके मिळाली तसेच मानाचे अर्थमंत्री सुवर्णपदक सुद्धा मिळाले.

-----------------------------------

अग्निशमन सेवा दिवस

महापालिकेचे अग्निशमन दल नागपुरकारांसाठी सदैव तत्पर असते. हे सेवाकार्य अधिक बळकट करण्यासाठी यामध्ये लवकरच नव्या तंत्रज्ञानाचा वापर करु, अशी ग्वाही मा. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी अग्निशमन सेवा दिवसानिमित्त आज  मनपा मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात दिली. शहराच्या लोकसंख्येनुसार महापालिकेचे 11 अग्निशमन केंद्र आहेत. येत्या काळात ही संख्या 22 वर जाणार आहे. पाचपावली येथील नवीन अग्निशमन केंद्राचे लोकार्पण लवकरच होणार असून जुने अग्निशमन केंद्रांचे नुतनीकरण देखील या वर्षात होईल, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला.

-----------------------------------